R.No.MAHMAR/25/A3029

दैनिक
# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ८९ रविवार दि.१२ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## मी तुला आमदार करीन - मंत्री संजय शिरसाठ यांची विनोद खटके यांना ऑफर

लातूर :- येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक याठिकाणी व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि माजी मंत्री संजय बनसोडे यांना दैनिक लोकमतचा महाराष्ट्र रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी लातूरमध्ये झालेल्या कार्यक्रमात व्ही.एस. पँथर्सचे अध्यक्ष विनोद खटके यांना तू माझ्यासोबत राहा, तुला मी आमदार करीन, अशी थेट ऑफर दिली. विनोदभाऊ खटके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कमध्ये ७५ फुटी स्मारकासाठी मागणी केली होती. त्यावर मंत्री शिरसाठ म्हणाले, त्या स्मारकासाठी १२ कोटी रुपये मी देतो. शिरसाठ यांनी आपल्या कामगिरीचा उल्लेख करत सांगितले की, मी १२ कोटी नाही तर १२०० कोटींचे १२० वस्तीगृह बांधले आहेत, दलित-गोरगरिबांच्या मुलांसाठी प्रत्येक तालुक्यात वस्तीगृह उभे केले आहेत. तसेच विनोद भाऊ खटके यांच्या सामाजिक कार्याचा आपल्या भाषणातून गौरव केला.आणि वक्तव्यादरम्यान त्यांनी विनोदपूर्वक म्हटलं, खेळ कसा करायचा








ते संजय बनसोडे कडून शिका, तसेच या सत्काराला दोन संजय आहेत आणि तिसरा संजय तिकडे बोंबा मारतोय, असा अप्रत्यक्ष टोला संजय राऊत यांच्यावर साधला. कार्यक्रमात विनोद खटके यांनी मंत्री शिरसाठ, बनसोडे यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात भव्य सत्कार केला.यावेळी व्यासपीठावर शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड बळवंत जाधव, बाळाप्रसाद सोमाणी तसेच संघटनेचे जिल्हाभरातील असंख्य कार्यकत्यासह प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन भाऊ मस्के मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे,ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे संपर्कप्रमुख आनंद जाधव जिल्हाध्यक्ष शरद किणीकर विधिविभाग जिल्हाध्यक्ष ॲड प्रतिक कांबळे , कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी, ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड , बौद्धाचार्य केशव कांबळे ,गौसभाई शेख , बाबा कांबळे ,पंकज गायकवाड, गोविंद कांबळे ,सुरज सूर्यवंशी , अतुल होळकर ,मनोज गायकवाड आनंद कांबळे, ऋषी ढगे ,धनराज सुरवसे अजय वाघमारे सलमान घावठी रहीम कलाल राहुल जाधव दर्शन मसलेकर ,पंकज टिळक ,पंकज होळीकर ,महावीर कांबळे ,राघव भालेराव सिद्धार्थ किनीकर, ऑटो युनियन शहराध्यक्ष शाहरुख मनियार,अजय सूर्यवंशी सह असंख्य महिला पदाधिकारी उपस्थित होते .

## अहमदपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सुशोभिकरण कामाची सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केली पाहणी

लातूर :- जिल्ह्यातील अहमदपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराचे नगरपरिषदेमार्फत सुशोभिकरण करण्यात येत आहे. या कामाची सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज पाहणी केली. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार संजय बनसोडे, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, समाज कल्याण सहायक आयुक्त यादवराव गायकवाड, मुख्याधिकारी संतोष लोमटे यांच्यासह नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक व नागरिक यावेळी उपस्थित होते. अहमदपूर नगरपरिषदेमार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात करण्यात येत असलेल्या



सुशोभीकरण कामांमध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिका, अशोकस्तंभ, संसद भवनाची प्रतिकृती आदी कामांचा समावेश आहे. या कामांची सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट यांनी यावेळी पाहणी केली.

## आज नवी मुंबई ऐरोली येथे वंचित चा निर्धार मेळावा

**वंचित बहुजन आघाडी चे युवा नेते :**
**सुजात (दादा) आंबेडकर याची जाहीर सभा..!**

नवी मुंबई / के. एच. हनवते :- आज रविवार दिनांक : १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी = ०४ वाजता, लक्ष्मी नारायण म्हात्रे हॉल, (ऐरोली स्पोर्ट असोसिएशन जवळ) सेक्टर - ८ ऐरोली, नवी मुंबई येथे मान. सुजात (दादा) बाळासाहेब आंबेडकर हे निर्धार मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. आम्ही येतोय तुम्ही पण या..! येत्या काही महिन्यातच महानगरपालिकेच्या निवडणूका होणार आहेत, त्याला आपण सर्वांनी ताकदीनिशी सामोरे जाण्यासाठी चला..! ऐरोली..!! आपण सारे निर्धार करूया... गेल्या सहा तारखेला वाशी नवी मुंबई येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते : बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार मेळावा संपन्न झाला त्या जगजाहीर सभेत बाळासाहेब आंबेडकर म्हणाले की, येत्या नवी मुंबई महानगरपालिकेत आपले दहा ते पंधरा नगरसेवक निवडून आणण्याचा संकल्प करा फुले, शाहू, आंबेडकर हे विद्रोहाचे जनक आहेत आणि म्हणून आता आपल्या कार्यकर्त्याला पण आपण कुठे ? विद्रोह करायचा हे पण त्याला कळले पाहिजे सद्या सर्वत्र भांडवलशाही आणि घराणेशाहीने लोकशाही संपुष्टात येते की काय ? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे आणि म्हणून या विरूद्ध संकल्प करून आपले उमेदवार अधिक संख्येने निवडून आनुया, या निर्धार मेळाव्याला आपण सर्वांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून विजयाचा निर्धार करूया..! नवी मुंबईतील सर्व वंचित बहुजन आघाडी, महिला आघाडी, वंचित चे आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे जाहीर आवाहन नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : अश्वजीत जगताप, नवी मुंबई महासचिव : सुनील भोले तसेच महिला जिल्हाध्यक्ष : शिल्पाताई रणदिवे, महिला महासचिव : साक्षीताई लोटे आणि वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : गजानन भोईर यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे दैनिक महावृत्त प्रतिनिधी कल्याणराव हनवते यांना कळवले.




## लातूर ग्रामीण मतदार संघातील २५ ग्रामपंचायतीची निवड; आ. कराड यांच्या प्रयत्नातून कोट्यावधीचा निधी मिळणार

लातूर : - भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या सीएसआर निधी अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील २५ ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली असून निवड करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना विविध विकास कामासाठी प्रत्येकी ७५ लक्ष असे एकूण अंदाजे १९ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध होणार आहे. सदरील योजनेत समावेश केल्याबद्दल आ. कराड यांचे त्या त्या ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त केले.

लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या संबंधिताकडे विशेष प्रयत्न केले. केलेल्या प्रयत्नामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील तब्बल २५ गावांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्या त्या गावातील ग्रामपंचायत आणि भाजपा पदाधिकाऱ्यांनी शनिवारी दुपारी लातूर येथील भाजपाच्या संपर्क कार्यालयात आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून जाहीर आभार व्यक्त केले. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, हनुमंतबापू नागटिळक, चिटणीस दशरथ सरवदे, लातूर संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूरचे अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडळ अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, शरद दरेकर, सुरज शिंदे, उद्धव काळे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

ज्या गावांनी आणि जनतेनी आपल्यावर विश्वास टाकून निवडून




दिले अशा गावांचा सर्वांगीण विकास करणे हे आपले कर्तव्य समजून इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या सीएसआर निधीसाठी प्रयत्न केले. निवड झालेल्या ग्रामपंचायती विविध कामाच्या माध्यमातून मॉडेल होणार असून प्रत्येक गावात सर्व कामे दर्जेदार व्हावीत असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या सीएसआर निधीसाठी पुढच्या वर्षी मतदार संघातील उर्वरित गावांचा समावेश केला जाईल असे बोलून दाखवले.

लातूर ग्रामीण मतदार संघातील रेणापूर तालुका कोष्टगाव, पाथरवाडी, मुरढव, दवणगाव, सांगवी, माकेगाव, वांगदरी, घनसरगाव, दर्जी बोरगाव. लातूर तालुका गाधवड, सामनगाव, पिंपळगाव अंबा, अंकोली, गातेगाव, सावरगाव, निवळी, चिंचोलीराव, हिसोरी, ममदापूर, भातांगळी आणि भादा सर्कल मधील समदर्गा, भादा, वडजी, वरवडा, वानवडा या गावाची निवड करण्यात आली असून निवड झालेल्या गावात सीसीटीव्ही कॅमेरे, सभागृह, सोलारवर ग्रामपंचायत कार्यालय आणि पिण्याच्या पाण्याचा पंप हाऊस, आरो प्लांट, डिजिटल शाळेची वर्गखोली, जि.प. शाळा सोलार वर करणे, शाळेची रंगरंगोटी दुरुस्ती, हायमस्ट दिवे, एलईडी पोलसह पथदिवे, सिमेंट रस्ता, पेव्हर ब्लॉक यासह विविध कामे केली जाणार आहे.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून निवड झालेल्या लातूर ग्रामीण मतदार संघातील २५ गावात जनहिताची कामे होणार असून विविध सर्वांगीण विकासाला गती मिळणार असल्याने त्या त्या गावात मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

## लातूर ग्रामीणमध्ये भाजपाला शंभर टक्के यशासाठी सर्वांनी प्रयत्न करावे-आ. कराड

लातूर : - विधानसभा निवडणुकीत सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली, जिकरीचे प्रयत्न केले. मतदारानी मोठा आशीर्वाद दिला यामुळेच लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपाच्या विजयाचा नवा इतिहास घडला. येणाऱ्या काळात होणाऱ्या रेणापूर नगरपंचायतीसह जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपाला शंभर टक्के यश मिळावे यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे असे आवाहन भाजपा नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केले.

येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक अनुषंगाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाच्या प्रमुख पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीची बैठक भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी दुपारी झाली. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, हनुमंतबापू नागटिळक, चिटणीस दशरथ सरवदे, लातूर संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूरचे अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडळ अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, शरद




दरेकर, सुरज शिंदे, उद्धव काळे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

येत्या नोव्हेंबर महिन्यात नगरपालिका, नगरपंचायतीच्या आणि डिसेंबर महिन्यात जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका होतील असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मागील वेळी रेणापूर नगरपंचायत आणि रेणापूर पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात आली होती तर जिल्हा परिषदेच्या ११ पैकी ६ जागेवर यश मिळाले होते. बहुतांशी जागा अत्यंत कमी मताने आपल्या हातून गेल्या. यावेळी प्रत्येक मतदार संघात,नप प्रभागात पक्षाच्या वतीने जनतेच्या भावना जाणून घेऊन जनतेच्या शिफारशीनुसार उमेदवारी दिली जाईल असे बोलून दाखवले.

लातूर ग्रामीण मतदार संघातील जवळपास सर्वच मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत मोठ्या प्रमाणात विकासाची कामे झाली, शासनाच्या विविध योजनेतून निधी मिळवून दिला.

गेल्या महिन्यात झालेल्या सततच्या पावसामुळे आणि पूर परिस्थितीमुळे नुकसानीत सापडलेल्या शेतकऱ्यांना राज्यातील महायुती शासनाने पॅकेज जाहीर करून मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. एवढे मोठे पॅकेज आजपर्यंत कोणीच दिले नाही. असे सांगून संत श्री गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचे राज्यात सर्वप्रथम विजयादशमीच्या दिवशी गाळप सुरू झाले असून दिवस रात्र कारखाना सुरू आहे. आडवणूक होत असलेल्या शेतकऱ्यांना ऊस उत्पादकांना कारखान्याच्या माध्यमातून सक्षम पर्याय मिळाला आहे.

भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आपसातील हेवे दावे मतभेद बाजूला ठेवून संपूर्ण लातूर ग्रामीण मतदार संघातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शंभर टक्के भाजपला यश मिळाले पाहिजे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत रेणापूर नगरपंचायत रेणापूर पंचायत समिती पुन्हा भाजपाच्याच ताब्यात आल्या पाहिजेत आणि लातूर पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकला पाहिजे या ध्येयाने आणि जिद्दीने सर्वांनी कामाला लागावे असेही आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

या बैठकीस लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दशरथ सरवदे यांनी आभार मानले.

## संपादकीय

# विखारी प्रचार

सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्याबाबत घडलेला प्रकार अत्यंत लाजीरवाणा होता. त्यात काय कारवाई करायची ती करून त्याचा सोक्षमोक्ष लावणे योग्य राहील. तसेच व्हायला हवे आणि या ओंगळ प्रकारची चर्चा थांबवायला हवी. कोळसा कितीही उगाळला तरी तो काळाच असतो हे माहिती असूनही तो उगाळण्यात जी धन्यता मानली जाते आहे ती अनाकलनीय आहे. झालेल्या घटनेच्या मुळाशी जाऊन तेथे शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक आहे व त्याकडे लक्ष द्यायला हवे. हल्ल्याचा प्रयत्न करण्याची कृती अचानक घडली असे भासत असले तरी कोणतीही कृती अचानक होत नसते. त्यासाठी अगोदर एक मैदान तयार केले जाते अन् त्याला एक पार्श्वभूमी असते.

ही तयारी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अशा दोन्ही स्वरूपाची असू शकते. त्यातूनच मते तयार केली जातात, बिघडवली जातात. कानात आणि मनात विष ओतले जाते. याचाच परिपाक म्हणून अनियंत्रित झालेली एखादी व्यक्ती असे काहीसे कृत्य करण्यास धजावते जे सरन्यायाधीशांच्या बाबतीत घडले. खरी समस्या आहे तिथेच. या विखारी विचारपेरणीला रोखणेच महत्त्वाचे. ते न केल्यास भविष्यात अशा वारंवार मान खाली घालायला लावणार्या घटना होत राहतील. समाज माध्यमांच्या संदर्भात केवळ न्या. गवई यांनीच नाही तर विविध न्यायालयांच्या न्यायाधीशांनी वेळोवेळी धोक्याचे इशारे दिले आहेत.

तसेच एखाद्या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी याचिका दाखल करताना याचिकाकर्त्याचा त्याने ज्या उद्देशाने ती याचिका दाखल केली आहे तोच उद्देश असतो असे नाही. बर्याचदा अंतस्थ हेतू वेगळे असतात आणि न्यायासनावर बसलेल्या व्यक्तींपासून ते लपून राहू शकत नाही. त्यावर ते प्रखर टिप्पणी करतात, प्रसंगी दंडही ठोठावतात. संबंधित याचिकाकर्त्याला अगदी तेच हवे असते कारण त्याने खरेच जनहितासाठी याचिका केली असेल तर तिची फारशी चर्चा होणारही नाही. त्याने जर प्रसिद्धीच्या हेतूने किंवा कोणाला लक्ष्य करण्यासाठी याचिका दाखल केली असेल तर त्याच्यावर त्याला अपेक्षित अशी शेरेबाजी उमटली तर त्याचाच हेतू साध्य होतो. खुद्द गवई यांनीही याबाबत भाष्य केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, न्यायाधीश जे तोंडी बोलतात त्याचा न्यायालयाच्या बाहेर आणि समाजमाध्यमांवर काय अर्थ काढला जाईल याची काहीच शाश्वती नसते.

एका प्रकरणात आपणच आपल्या सहकारी न्यायाधीशांना टिप्पणी करण्यापासून रोखले होते. त्याचे कारणच हे होते की त्या टिप्पणीचा अनर्थ काढून नव्या वादाला तोंड फुटले असते. स्वत: गवई यांच्याबाबतीत मात्र नेमके तसेच झाले जे टाळण्याची ते खबरदारी घेतात. गवई प्रकरण ताजे असल्यामुळे त्याची चर्चा होते आहे. निर्लज्जपणाचा कळस म्हणजे अत्यंत लांच्छनास्पद घटना घडूनही त्यावर संबंधित अनियंत्रित माध्यमांवर कोणताही मुलाहिजा न बाळगता सविस्तर चर्चा घडवून आणल्या जात आहेत आणि माथी भडकावण्याचे काम सुरूच आहे. कुठे जाती शोधण्याचा प्रयत्न होतोय तर कुठे विचारधारा आणि तिचे कुळ आणि मुळापर्यंत जाण्याचा प्रकार सुरू आहे.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे गवईंच्यावर हल्ल्याचा प्रयत्न मुळात अशाच विखारी अपप्रचार आणि सामग्रीतूनच उत्पन्न झाला. आपला देश मोठा आहे, असंख्य हातात स्मार्ट फोन आहेत. अगदी नेमकेपणाने सांगायचे झाले तर ८० ते ९० कोटी लोकांकडे ते असावेत. त्यावर अव्याहतपणे मजकुराची त्सुनामी सुरू आहे. काही पापभिरू लोक शुभेच्छा संदेशासाठी आणि व्यक्तिगत मनोरंजनासाठी या माध्यमाचा वापर करतात. तथापि, मोठा वर्ग किंवा गट असा आहे की तो त्यांच्या स्वत:च्या नकळत त्यांच्या वापरकर्त्यांच्या हातचे बाहुले बनला आहे. न्या. गवई पदावर आल्यापासून त्यांनी संविधानाच्या संदर्भात विधाने केली.

जी केली ती संविधानाच्या चौकटीत केली आणि संविधानाच्या बलस्थानांची साक्ष देणारी केली. देशातल्या विविध माध्यमांत आणि कार्यक्रमातच नव्हे तर परदेशातही त्यांनी केली. त्यांची हीच भूमिका त्यांच्या अलीकडच्या निवाड्यांमध्येही दिसली. हा देश संविधानाच्या चौकटीनुसारच चालतो हे त्यांचे परदेशातील भूमीवर केलेले विधान लक्षवेधी ठरले. त्यांचे पूर्वसुरी न्या. डी. वाय. चंद्रचूडही बर्याच कार्यक्रमांत आणि मंचांवर बोलायचे. दोन्ही न्यायाधीश जे बोलले ते कायद्याला धरून आणि संविधानाच्या चौकटीतच. मात्र विटंबना अशी की चंद्रचूड यांनाही लक्ष्य करणारे कथित विचारवंत वेगळे होते अन् आता गवई यांना लक्ष्य करणारे वेगळे. त्यात उजवे-डावे आणि सगळ्याच रंगांचे लोक आपापल्या वकुब आणि सोयीनुसार भूमिका घेत बेबंदपणे आपले विचार मांडते झाले.

केवळ न्यायाधीशच नव्हेत, तर साहित्यिक आणि राजकीय मंडळी सगळेच या मीडिया ट्रायलला सातत्याने सामोरे जात आहेत. निवडणूक आयोगापासून ते संसदेपर्यंत आणि विरोधी पक्षनेत्यापासून पंतप्रधानांपर्यंत प्रत्येक घटनात्मक संस्था अथवा घटनात्मक पदावरील व्यक्ती या अशाच निरंकुश शाब्दिक हल्ल्यांना बळी ठरले आहे. हे हल्ले केवळ सोशल मीडियातील फिरवाफिरवीपर्यंत असते तर तेही एकवेळ चालण्यासारखे होते. मात्र त्यातून असंख्य लोकांची जी मने कलुषित केली जात आहेत ते घातक असून त्यातून भविष्यात अशा स्वरूपाच्या चीड आणणार्या आणि मान खाली घालायला लावणार्या घटना घडतच राहतील. अत्यंत व्यक्तिगत स्वरूपाचे हल्ले, अत्यंत आक्षेपार्ह टीका आणि टिप्पणी, शिवीगाळ आणि चारित्र्यहनन, इतिहासातील थोर नेत्यांचेही प्रतिमाभंजन आणि किळस वाटावा असा त्यांच्याबद्दल आणि त्यांच्या कुटुंबाबद्दलचा घाणेरडा प्रचार राजरोस सुरू आहे. माध्यमांवर परस्परविरोधी विचारांचे गट परस्परांवर तुटून पडत असले तरी त्यात अब्रू जातेय ती देशाची आणि लोकशाहीची. हे सगळे वेळीच रोखा म्हणायची वेळही आता गेली आहे. मात्र त्याचा बिमोड निश्चितच व्हायला हवा.

# मुख्य न्यायाधीशांवरचा हल्ला ही एक व्यक्तीविरुद्धची हिंसा नसून संविधानाविरुद्धची हिंसा

भारताची न्यायसंस्था ही लोकशाहीच्या चौथ्या खांबांपैकी एक नव्हे, तर तिचा आत्मा आहे. नागरिकांच्या हक्कांचे रक्षण, शासनाच्या मनमानीवर नियंत्रण आणि कायद्याचे अधिपत्य टिकवणे हे तिचे मूलभूत कार्य. अशा संस्थेच्या सर्वोच्च पदावर असलेल्या मुख्य न्यायाधीशांवर न्यायालयीन प्रांगणातच झालेला बूट फेकण्याचा प्रयत्न हा केवळ अशोभनीय नव्हे, तर लोकशाहीविरोधी आणि संविधानविरोधी कृत्य आहे. ही घटना भारतीय न्यायसंस्थेच्या प्रतिष्ठेला कलंक लावणारी आहे आणि तिचा निषेध प्रत्येक कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकाने करायलाच हवा. न्यायालय हे फक्त निर्णय देणारे स्थान नसते; ते न्याय आणि नैतिकतेचे मंदिर असते. ऍडव्होकेट ऍक्ट १९६१ आणि बार कौन्सिल इंडिया रुल्स यामध्ये स्पष्टपणे नमूद आहे की, न्यायालयीन प्रांगणात वकील किंवा नागरिकाचे वर्तन अत्यंत शालीन, संयमी आणि सभ्य असले पाहिजे. या घटनेने त्या शालीनतेच्या सीमा मोडल्या. न्यायालयीन सभागृहात कोणत्याही प्रकारची हिंसा किंवा आक्रमक वागणूक ही न्यायालयाची अवमानना गुन्ह्याच्या चौकटीत येते. न्यायाधीशावर बूट फेकणे म्हणजे न्यायालयाच्या प्रतिष्ठेचा अपमान - आणि संविधानाच्या आत्म्यालाच ठेच देणे. वकील वर्ग हा न्यायसंस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. ते न्यायप्रक्रियेतील अधिवक्ता असून, न्यायालय आणि जनतेमध्ये पुलाचे काम करतात. त्यामुळे त्यांच्याकडून उच्च दर्जाची जबाबदारी आणि शिस्त अपेक्षित असते. परंतु जेव्हा एखादा वकील स्वतःच हिंसाचाराचा मार्ग स्वीकारतो, तेव्हा तो केवळ स्वतःच्या व्यवसायाचा नव्हे, तर संपूर्ण कायदा व्यवसायाचा अपमान करतो. बार कौन्सिल ऑफ इंडिया ने या घटनेवर तत्काळ निलंबनाची कारवाई केली, हे प्रशंसनीय आहे. परंतु एवढ्यावर न थांबता अशा कृतींवर दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ५० मध्ये न्यायसंस्थेची स्वायत्तता हे मूलभूत तत्व मान्य केले आहे. मुख्य न्यायाधीशांवर थेट हल्ला म्हणजे या स्वायत्ततेलाच धोका. न्यायसंस्थेचा आदर राखणे हे फक्त न्यायाधीशांचे कर्तव्य नाही, तर प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. न्यायालयावर हल्ला करणे म्हणजे न्यायावरच हल्ला करणे. आणि जेव्हा न्यायावर हल्ला होतो, तेव्हा लोकशाहीचे श्वास घेणे कठीण होते. ही घटना केवळ शालीनतेचा भंग नाही, तर भारतीय दंड संहिता अंतर्गत गंभीर गुन्हा आहे.



सेक्शन ३५३ - सार्वजनिक सेवकाला त्याच्या कर्तव्याच्या पालनात अडथळा निर्माण करणे, सेक्शन ५०४ - उद्दीपक वर्तनाने शांतता भंग करणे, सेक्शन ५०५ - सार्वजनिक असंतोष पसरवणे, सेक्शन ५०६ - धमकी देणे - या कलमान्वये शिक्षा शक्य आहे. तसेच कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट १९७१ अंतर्गत ही कृती न्यायालयाचा अवमान म्हणून दंडनीय ठरते. अशा व्यक्तींवर कठोर आणि त्वरित कारवाई न झाल्यास, न्यायालयीन प्रतिष्ठेवर पुढील काळात आणखी गंभीर आघात होतील. न्यायालयीन परिसर हा अत्यंत संवेदनशील क्षेत्र आहे. तिथे होणाऱ्या सुरक्षाभंगाने न्यायाधीशांच्या सुरक्षिततेबरोबरच न्यायप्रक्रियेच्या शुद्धतेलाही धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य सरकारांनी न्यायालयीन सुरक्षेचे मानक वाढवावे, तसेच प्रत्येक उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात समर्पित सुरक्षा यंत्रणा स्थापन करावी.



न्यायालयीन प्रांगणात हिंसक किंवा उत्तेजक कृती करणाऱ्यांना कायमस्वरूपी प्रवेशबंदी केली पाहिजे. संविधानाने आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. परंतु हे स्वातंत्र्य अमर्याद नाही; ते कलम १९ (२) नुसार वाजवी मर्यादांमध्ये वापरले पाहिजे.मतभेद मांडायचे असतील तर कायदेशीर मार्ग आहेत-याचिका, अपील, सार्वजनिक चर्चा. पण हिंसेचा मार्ग निवडणे म्हणजे लोकशाहीला अपवित्र करणे. भारताची लोकशाही मतभेद सहन करते, परंतु असहिष्णुता आणि हिंसा स्वीकारत नाही. ही घटना केवळ एका न्यायाधीशाविरुद्ध नसून संपूर्ण न्यायसंस्थेविरुद्ध आहे. म्हणूनच या घटनेचा निषेध हा केवळ न्यायालयांचा नव्हे, तर सर्व समाजाचा असायला हवा. शाळा, महाविद्यालये आणि कायद्याच्या शिक्षणसंस्था यांनी विद्यार्थ्यांमध्ये न्यायसंस्थेबद्दल आदरभाव निर्माण करण्याचे कार्य करावे. वकील संघटनांनी स्वतःच्या सदस्यांमध्ये शिस्त, संयम आणि वैचारिक परिपक्वतेची जाणीव निर्माण करावी. मुख्य न्यायाधीशांवरचा हल्ला ही एक व्यक्तीविरुद्धची हिंसा नसून संविधानाविरुद्धची हिंसा आहे. न्यायसंस्था ही देशाच्या आत्म्याचा केंद्रबिंदू आहे. तिचा अपमान म्हणजे आपल्या स्वातंत्र्याचा, आपल्या हक्कांचा, आणि आपल्या लोकशाहीच्या अस्तित्वाचा अपमान. अशा घटनांचा निषेध केवळ शब्दांनी नव्हे, तर कृतीने होणे आवश्यक आहे-कायद्याची कठोर अंमलबजावणी, न्यायालयीन सुरक्षा वाढवणे, आणि न्यायसंस्थेच्या प्रतिष्ठेचे रक्षण हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

******

- दादाराव कैलास तायडे.
समाजविचारक आणि संशोधक. राजकीय शास्त्रात एम.ए. आणि एल.एल.बी. पदवीधर. बौद्ध तत्त्वज्ञान, सामाजिक न्याय आणि भारतीय राज्यघटना या विषयांवर लेखन.

# कैवारी म्हणविणारेच मारेकरी

शेड्यूल ९च्या कायद्याच्या विरुद्ध शेतकर्यांना कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यास बंदी घालण्यात आली आहे. ही क्रूर थट्टा १९५१ पासून आजतागायत बिनदिक्कत सुरू आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकर्यांना अक्षरश: देशोधडीला लावले आहे. लाखो एकर शेती खरवडून गेली. पिकांचे, जनावरांचे, मालमत्तेचे अतोनात नुकसान झाले. निसर्गच कोपल्याने बोल लावणार तरी कोणाला? हे नुकसान आपल्या डोळ्यांना दिसते, तरी पण सरकार नावाच्या सिस्टीममध्ये बसलेली 'शेतकर्यांचीच मुले' निसर्गापेक्षा हजार पट अधिक नुकसान करत आहेत. हे नुकसान डोळ्यांना दिसत नाही, पण शेतकर्याच्या आयुष्याची आवाज न करता वाताहत करीत आहे.

शेतकरी हा राजकारणी, मध्यमवर्गीय, श्रीमंत, नवश्रीमंत यांच्या सर्वांच्या अनास्थेचा विषय आहे. शेतकर्यांकडे उपद्रवमूल्य नाही म्हणून राजकारणी त्याला गांभीर्याने घेत नाहीत. मध्यमवर्गियांना स्वस्तात शेतमाल हवा असतो म्हणून त्याच्या दृष्टीतून शेतकरी मेला तरच हे शक्य, श्रीमंत आणि नवश्रीमंताना त्यांचे स्वतंत्र जग असते. शेतकरी नावाचा कोणी 'जीव' असतो हे या वर्गाला माहीत असण्याचे कारणच नाही. शेतीसाठी लागणार्या निविष्ठांचा बाजार आणि इतर ग्राहकांसाठीची बाजारपेठ यात जमीन अस्मानचे अंतर आहे, फरक आहे. इतर वस्तूंची बाजारपेठ ग्राहक केंद्रित, त्याला भूलविणारी असते, आमिष दाखवून वस्तू गळ्यात मारणारी असते. पण शेती निविष्ठांच्या बाजारपेठेची रचनाच शेतकर्यांना लूटणारी, अडवून वस्तू गळ्यात मारणारी असते. 'लिंकींग' हा त्यातलाच प्रकार!

शेतकर्याला आवश्यक असणारे खत उपलब्ध असते, पण त्या खताबरोबर अनावश्यक दुसरे एखादे खत त्याच्या माथी मारले जाते. ते दुसरे खत खरेदी केले तरच आवश्यक खत शेतकर्याला दिले जाते. असा प्रकार इतर बाजारात दिसत नाही. असा प्रकार करणार्या कंपन्या मोठ्या आहेत. त्यांच्या विरोधात कधीही कारवाई केली जात नाही. शेतीसाठी लागणारी खते, बियाणे, औषधे बाजारात मोठ्या प्रमाणात बनावट स्वरुपात उपलब्ध असतात. त्याविरोधात कायदे आहेत, पण त्यांची अंमलबजावणी केली जात नाही. शेतकरी मात्र बनावट निविष्ठा वापरून नुकसान करून घेत आहे. शेतीसाठी लागणार्या रासायनिक औषधांच्या बाबतीतही हीच बोंब आहे. औषधांच्या किमतीचे नियमन करणारी कुठलीही यंत्रणा सरकारकडे नाही. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात लूट केली जात आहे. सोयाबीनवरील अळीनियंत्रणासाठी सर्रास वापरल्या जाणार्या 'क्लोरऑन्ट्रीनिलीप्रोल' या औषधाचे उदाहरण यासाठी फार बोलके ठरावे.

एका प्रसिद्ध मल्टिनॅशनल कंपनीने या औषधासाठी आपला ब्रॅन्ड विकसित केला आहे. शेतकर्यांमध्ये तो खूप लोकप्रिय आहे. या कंपनीच्या १५० मिली औषधाच्या बाटलीसाठी शेतकर्याला दोन हजाराच्या आसपास पैसे मोजावे लागतात. पण तेच औषध इतर कंपन्यांचे घेतले तर १५० मिलीची बाटली फक्त ७१० रुपयांना मिळते. औषध एकच पण दर मात्र वेगळे आणि भयानक! यावर कोणाचेच नियंत्रण नाही. कंपन्यांच्या नफ्याला आणि शेतकर्याच्या तोट्याला मर्यादा नाही. गेल्या २० वर्षातील शेतमालाच्या दराचा



विचार केल्यास फारशी वाढ झालेली दिसत नाही. त्या तुलनेत शेती निविष्ठांचे दर प्रचंड वाढले आहेत.

१२ वर्षांपूर्वी ३९५ रुपयांना मिळणारी १२:३२:१६ या ग्रेडच्या खताची गोणी आज १५०० ते १८०० रुपयांच्या खाली मिळत नाही. (दुकानदाराच्या लहरीनुसार) सरकारी पातळीवर यासाठी राबविली जाणारी पॉस मशिनची यंत्रणा पूर्णपणे फेल झाली आहे. खतांचे, औषधांचे दर ४ ते ५ पट वाढले आहेत. पण शेतीमाल मात्र जमिनीवरच रांगत आहे, त्याचे कोणालाही दु:ख नाही. त्यातही सरकार नावाचा शेतकर्यांचा कैवारी आयात निर्यातीचा खेळ खेळतो. हा खेळ खरंतर शेतकर्याच्या, त्याच्या लेकरांच्या, त्याच्या अर्धांगिणीच्या जीवाशी असतो. पण सरकार तो बिनधास्त खेळतो. कारण सरकारला शेतकर्यांना सोडून सगळ्यांना जगवायचे आहे. मग ते शेतकर्यांना मारून का असेना.

आताही अतिवृष्टीने शेतकरी घायाळ झाला आहे. पण सरकार मात्र कागद गोळा करण्यात मग्न आहे. सर्वजण शेतकर्यांच्या जीवावर उठले आहेत असे वाटावे, इतकी परिस्थती भयानक आहे. आता हेच पहा, शेतकर्याला जाणीवपूर्वक झिजून-झिजून मारण्यासाठी कशी अधिकृत व्यवस्था करून ठेवलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत शेतकर्याला खर्या अर्थाने न्याय दिला होता. पण १८ जून १९५१ रोजी संविधानात पहिली घटना दुरुस्ती करून शेतकर्यांची अधिकृत लूट करण्यासाठी शेड्यूल ९ घुसविण्यात आले. या शेड्यूल ९ मध्ये तब्बल २५० पेक्षा जास्त कायदे शेतकर्यांना गुलाम बनवून गरीबच ठेवण्यासाठी बनवले गेले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ संविधानात एकूण ८ शेड्यूल (परिशिष्ट)चे होते. त्यात शेतकर्यांना संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले होते. शेतकरी जमिनीचा मालक होता. शेड्यूल ९ ने त्याला फक्त भोगवटादार करण्यात आले. यातील आवश्यक वस्तू कायदा, हा कायदा शेतकर्यांसाठी सगळ्यात जास्त हानिकारक आहे. या कायद्याचा सरकार वेळोवेळी उपयोग करते व शेतकर्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाचे भाव पाडते. शेतीमालाला निर्यातबंदी, भाव पाडण्यासाठी शेतीमालाची आयात, आयात शुल्कात सवलत, शुल्कमुक्त आयात, शेतीमालाची साठा बंदी (स्टॉक लिमिट) अशी हत्यारे वापरून शेतीमालाचे भाव पाडण्याचे काम सरकार करते.

या शेड्यूल ९च्या कायद्याविरोधात भारतीय शेतकर्यांना कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येत नाही. कारण शेड्यूल ९च्या कायद्याच्या विरुद्ध शेतकर्यांना कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यास बंदी घालण्यात आली आहे. ही क्रूर थट्टा १९५१ पासून आजतागायत बिनदिक्कत सुरू आहे. या देशात अतिरेकी, देशद्रोही, चोर, दरोडेखोर, बलात्कार करणारे, खून करणारे यांना न्याय मागण्याचा अधिकार आहे; पण शेतकर्याला नाही. मागील कालखंडात सर्वोच्च न्यायालयाने अतिरेकी अफजल गुरूसाठी मध्यरात्री सुनावणी घेऊन न्यायदान दिले. पण शेतकर्याला मात्र येथे जाणीवपूर्वक न्याय नाकारला जातो.

देश सन १९४७ ला स्वतंत्र झाला. पण शेतकरी मात्र १९५१ ला पारतंत्र्यात गेला. तो आजतागायत! सरकारने त्याला साखळदंडाने जखडून टाकून पूर्णपणे गुलामगिरीत ढकलले. शेतमालाला भाव आणि सरकारने जाणीवपूर्वक तयार केलेले निष्ठूर कायदे, सरकारी धोरणे ही मूळ दुखणी आहेत. ते कोणाच्या लक्षात येऊ नये, म्हणून सन्माननिधी, जीएसटी कमी, हमीभाव जाहीर करणे, शेतकर्यांसाठी फार करतोय, अशी दांभिक नौटंकी केली जाते. 'आजार म्हशीला आणि उपचार मात्र जाणूनबुजून पखालीला' अशी अवस्था आहे.

# मानसिक आरोग्याचा जागर

जागतिक मानसिक आरोग्य दिनाची प्रत्येक वर्षी थीम वेगवेगळी असते. याच अनुषंगाने यावर्षीचा विषय आहे 'सेवांची उपलब्धता- आपत्ती आणि आपत्कालीन परिस्थितीतील मानसिक आरोग्य.' हा विषय जास्त महत्त्वाचा ठरतो कारण आजच्या जगात नैसर्गिक आपत्ती, संघर्ष, युद्धजन्य स्थिती, महामारी किंवा इतर आणीबाणीच्या प्रसंगांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. अशा वेळी लोकांना मानसिक आधार व उपचार मिळणे ही एक मूलभूत गरज ठरते.

सेवांची उपलब्धता

आजच्या गतिमान आणि तंत्रज्ञानाच्या युगात नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी मूलभूत व सार्वजनिक सेवांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामध्ये प्रामुख्याने जीवनावश्यक सेवा, शिक्षण, आरोग्य (शारीरिक व मानसिक) व सामाजिक सेवा इत्यादी अशा अनेक क्षेत्रांतील सेवा समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. केवळ सेवा उपलब्ध असणे पुरेसे नाही तर त्या सेवा वेळेवर, सहजपणे आणि योग्य स्वरूपात उपलब्ध करून देणे ही बाब तेवढीच महत्त्वाची आहे.

सेवांची उपलब्धता म्हणजे एखादी सेवा नागरिकांना त्यांची आवश्यकता असताना त्यांच्या जवळच्या ठिकाणी सहजपणे आणि प्रभावीपणे प्राप्त होणे. ही संकल्पना सामाजिक समता, न्याय आणि विकासासाठी एक महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण व शहरी भागातील सेवा-वाटपातील तफावत, तांत्रिक अडचणी व माहितीच्या अभावामुळे अनेकवेळा सेवा उपलब्ध असूनही त्या गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे मानवी जीवनात अनेक समस्या निर्माण होतात.

आपत्तीतील मानसिक आरोग्य

महापूर, महामारी, भूकंप, चक्रीवादळ, युद्ध, दहशतवाद, दुष्काळ व अपघात अशा आपत्तीजन्य परिस्थितींमुळे लोकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होते. जीवितहानी, संपत्तीचे नुकसान, कुटुंबातील व नातेसंबंधातील व्यक्तींचा मृत्यू, स्थलांतर यामुळे असुरक्षिततेची भावना निर्माण होऊन त्यांच्या मानसिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. उदाहरणार्थ, नैराश्य, चिंता, ताण व आघातानंतरचे तणाव विकार यांची शक्यता वाढते. त्यामुळे अशा परिस्थितीत समाजातील व्यक्तींना सेवांची उपलब्धता करून देणे व त्यांच्यापर्यंत सेवा योग्यवेळी पोहोचविणे ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे.

आजपर्यंत विविध देशांमध्ये अनेक प्रकारच्या आपत्ती घडून गेलेल्या आहेत. आपल्याही देशात काही राज्यांमध्ये महापुराने थैमान घातले. अशा परिस्थितीत समाजातील अनेक कुटुंबाचे अतोनात नुकसान (जीवित व वित्तीय हानी) झाले आहे. तसेच लोकांची मानसिक स्थिरता धोक्यात आली आहे. त्यामुळे अनेक व्यक्तींना चिंता, ताण-तणाव व नैराश्य अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा अनेक समस्यांनी ग्रस्त असणार्या व्यक्तींनी आपले जीवन संपविले आहे व काही व्यक्ती जीवन संपविण्याचा विचार करत आहेत.

त्यामुळे आपत्ती व आणीबाणीतील कालखंडामध्ये शारीरिक मदत पुरेशी नसते, तर मानसिक आधाराचीही नितांत गरज असते. मानसिक आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत मानवी हक्क आहे. मानसिक आरोग्य सेवांची उपलब्धता करून देणे ही महत्त्वाची बाब आहे. शहरात किंवा खेडेगावातही प्रत्येकाला मानसिक आरोग्य सेवा मिळणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्य सेवा प्रत्येक व्यक्तीला सहज उपलब्ध व्हाव्यात हा या विषयाचा केंद्रबिंदू आहे. समुपदेशन, मानसोपचार, औषधोपचार व सल्ला केंद्रे या सर्व सेवांचा दर्जा व उपलब्धता सर्वांसाठी समान असली पाहिजे.

संपूर्ण जगात नैसर्गिक आपत्ती वारंवार घडताना दिसून येतात. उदाहरणार्थ, महापूर, दुष्काळ, भूकंप तसेच कोविडसारख्या महामारीच्या काळात मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा पोहोचवणे हे अजूनही मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर २०२५चा हा विषय अत्यंत योग्य व परिणामकारक ठरतो.

# इतिहासातील सर्वात मोठी थाप फडणवीस सरकारने मारली : हंबरडा मोर्चातून उद्धव ठाकरेंचा घणाघात

गेल्या काही दिवसांपूर्वी राज्यात पावसाने मोठे थैमान घातले. पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना मदत जाहीर केले आहे. मात्र, संपूर्ण कर्जमाफी आणि ओला दुष्काळ याबाबत कोणताही ठोस निर्णय घेतला नाही.

यावरून आता राजकारण आणखी तीव्र होताना दिसत आहे. याचे कारण म्हणजे उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली असून छत्रपती संभाजीनगरमध्ये आयोजित हंबरडा मोर्चातून त्यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या मदतीच्या पॅकेजवर उद्धव ठाकरे यांनी आक्षेप घेत जोरदार प्रहार केला. पॅकेज पाहिल्यावर सगळ्यांना असं वाटलं की इतिहासातलं सर्वात मोठं पॅकेज आहे. पण नाही ही इतिहासातली सर्वात मोठी थाप आहे. आजपर्यंत इतकी मोठी थाप कोणत्याही सरकारने मारलेली नाही. इतकी मोठी थाप देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मारलेली आहे, असा जोरदार निशाणा उद्धव ठाकरे यांनी लगावला. या मोर्चात मोठ्या प्रमाणावर पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी



झाले होते. सरकारने जाहीर केलेले पॅकेज शेतकऱ्यांना अमान्य आहे. सरकारचे पॅकेज ही मोठी थाप असून स्वतःचीच पाठ खाजवून घेत आहेत, थोपटून घेत आहेत, असा जोरदार हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोलताना केला. सरकार कर्जमाफी करत नाही, तोपर्यंत या सरकारला आम्ही सोडणार नाही. असा इशाराही त्यांनी दिला. तुम्हाला चाबूक हातात घ्यावा लागेल आणि. शेतकऱ्यांनी सरकारकडे हेक्टरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी केली आहे.

पण पन्नास हजार रुपये हेक्टरी आपण कोणाकडे मागत आहोत तर ५० खोके ज्यांनी घेतले आहे, असा आरोप उद्धव ठाकरेंनी केला. हे सहजासहजी वठणीवर येणार नाहीत. तुम्हाला चाबूक हातात घ्यावा लागेल आणि यांना बरोबर वठणीवर आणावे लागेल. असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

## कोरडेवाडीच्या साठवण तलावासह इतर मागण्या साठी जलसमाधी आंदोलन राजश्री राठोड यांचे ९ दिवसा पासून पासून उपोषण

उपविभागीय अधिकारी ढाकणे बोलताच आंदोलन मागे....
केज येथील जलसंधारन उपविभागाचे उपविभागीय अधिकारी ढाकणे यांचेशी भ्रमनध्वनी वरून बोलणे होताच लवकरच मंत्रालयातून पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र आपल्याला उपलब्ध होणार असल्याचे आश्वासन देताच हे जलसमाधी आंदोलन मागे घेण्यात आले.

केज/प्रतिनिधी ज्ञानराधा मल्टी स्टेट मधील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्यात, राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा आणि कोरडेवाडीच्या साठवण तलावाच्या कामासाठी लागणारे पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र देण्यात यावे. या मागण्यासाठी मागील सहा दिवसापासून छत्रपती संभाजीनगर येथील धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्री राठोड या ९ दिवसा पासून कोरडेवाडी येथे उपोषणाला बसल्या आहेत. तीन दिवसापूर्वीच गावकऱ्यांनी तहसील कार्यालयाच्या परिसरात बैलगाडीत साठाभरून आणलेल्या लाकडासंह बैलगाडी पेटवून देऊन प्रशासनाचा निषेध नोंदविला होता. तरीही प्रशासन याकडे गांभीर्याने पाहात नसल्याच्या निषेधार्थ प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी शनिवारी सकाळी साडे आकारा वाजल्यापासून पासून दुपारीं साडे तीन वाजेपर्यंत ५० हुन अधिक,

४ आंदोलक रुग्णालयात..
जलसमाधी आंदोलन करताना गोरख मारुती शिंदे, विक्रम अभिमान शिंदे, शौकत निजाम शेख आणि मदन आश्रुबा यादव यांच्या नाका, तोंडात पाणी गेल्यामुळे बोटीच्या साहाय्याने सुरक्षा दलाच्या जवानाने या चौघांना पाण्या बाहेर काढून त्यांना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आसून त्यांची तब्बीयत धोक्या बाहेर असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे यांनी बोलताना दिली.

महिला व नागरिक यांनी कोरडेवाडी पासून ६ किमी अंतरावर असलेल्या वडवणी तालुक्यातील टोकेवाडी शिवारातील पाझर तलावातील पाण्यात शिरून तीन तास जलसमाधी आंदोलन केले. नायब तहसीलदार अशोक भंडारे, जलसंधारण विभागाचे शाखा अभियंता मुंडे, खोदे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे पथक, ३ प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य पथक, अग्नीशामक दलाच्या गाडीसाह, राज्य आपत्ती व्यवस्थिसपण कक्षाचे पथक,पाण्यातील बोटीसह, सुरक्षा जवान यांचे पथक, ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी घटणास्थळी तैनात होते.



## राष्ट्रीय पोषण महा २५ कार्यक्रम संपन्न

उदगीर / प्रतिनिधी तालुक्यातील निडेबन अंगणवाडी क्रमांक एक, दोन, तीन, चार व पाच येथे राष्ट्रीय पोषण महा २०२५ पोषण अभियान संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलवानेत झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानवी हक्क अभियान मराठवाडा प्रसिद्धीप्रमुख अर्जुनराव जाधव हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून दामिनी पथक प्रमुख तथा वाहतूक पोलीस हेडकॉन्स्टेबल सोनाली ढगे, महाराष्ट्र शासननियुक्त शासकीय सदस्य तथा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, बचत गटाच्या सीआरपीओ सौ.कविता राठोड, सेवानिवृत्त जेष्ठ कार्यकर्ते व्यंकटराव कोदळिकर उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक उदगीर शहर पोलीस ठाण्यातील दामिनी पथक प्रमुख हेड कॉन्स्टेबल सोनाली ढगे यांनी दामिनी पथकाची नियुक्ती संदर्भातील कामे व कार्ये संदर्भात, बॅड टच आणि गुड टच संदर्भातही मार्गदर्शन केले. तसेच दलित मित्र बालासाहेब शिंदे यांनी सक्षम अंगणवाडी आणि पोशन २.० हे एकात्मिक पोषण सहाय्य कार्यक्रमांची रूपरेषा सांगितले. तसेच पोषण सहाय्य कार्यक्रमा मध्ये मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांमधील कुपोषणाच्या आव्हानांना सामोरे जाण्याचा प्रयत्न केला जातो. आरोग्य आणि रोग प्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या पद्धती विकसित आणि प्रोत्साहन देण्यासाठी एक अभिसरण इको सिस्टीमच्या निर्माण करणे हा पोषण सहाय्य कार्यक्रम चा उद्धेश असल्याने ह्यांचे लाभार्थी मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती महिला आणि स्तनंदा माता पोषण २.० ची उद्दिष्टे अंगणवाडी सेवा अंतर्गत पूरक पोषण कार्यक्रम किशोरवयीन मुलीसाठी योजना आणि पोषण अभियान हे एकात्मिक पोषण सहाय्य कार्यक्रम म्हणून पोषण २.० अंतर्गत असल्याचे सांगितले. यावेळी अंगणवाडी क्रमांक एकच्या कार्यकर्ती चंचला शिवाजीराव हुगे, मदतनीस उषा नामेवार, अंगणवाडी क्रमांक दोनच्या कार्यकर्ती सुमनबाई देवनाळे, मदतनीस पूजा चिलकलवार, अंगणवाडी क्रमांक तीनच्या कार्यकर्ती ज्योती लक्ष्मण करकरे-खादीवाले, मदतनीस संगीता कांबळे तसेच अंगणवाडी क्रमांक चारच्या कार्यकर्ती विजया चौधरी, मदतनीस वनमाला भालेराव, अंगणवाडी क्रमांक पाचच्या कार्यकर्ती शोभा साळुंके, मदतनीस महादेवी वैजनाथ हाळ्ळे यांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विशेष असे परिश्रम घेतले. यावेळी गरोदर मातांची पोषण आहाराने ओटी भरण्यात आली. तर सहा महिन्यांच्या बाळाला आहार पाषाण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक कार्यकर्ती चंचला शिवाजीराव हुगे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्योती करकरे यांनी मानले.

## निवडणुका महायुती की स्वबळावर; निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिकांना, मुख्यमंत्री फडणवीसांचे स्पष्टीकरण

पुणे: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका महायुतीच्या माध्यमातून लढवायच्या की स्वबळावर याचा निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिक पातळीवरील पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पुण्यातील शुभारंभ लॉन्स येथे पश्चिम महाराष्ट्रातील भाजपच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

ते म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रातील आमदार, खासदार, अध्यक्ष, यासह प्रमुख पदाधिकारी यांची आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हानिहाय आढावा घेतला. निवडणूक लढविताना शक्य तेथे महायुतीच्या माध्यमातूनच निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महायुतीमधून निवडणूक लढवायची की स्वतंत्र याचे संपूर्ण अधिकार स्थानिक पातळीवरील पदाधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये कोणताही हस्तक्षेप केला जाणार नाही. मात्र स्वतंत्र निवडणूक लढवितानाही मित्र पक्षावर टोकाची टीका करायची नाही, अशा स्पष्ट सूचना या बैठकीत पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

आपत्तीग्रस्तांन् मदत मिळाली नाही तर रस्त्यावर उतरण्याचा इशारा शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला आहे? या प्रश्नावर ते म्हणाले, रस्त्यावर उतरण्याची वेळ उद्धव ठाकरे यांच्यावर येणारच नाही, दिवाळीपूर्वी मदत मिळेल.

'प्रबळ' पदाधिकाऱ्याला भाजपच्या प्रवेशाची दारे खुली

भारतीय जनता पक्षात येण्यासाठी अनेकांची तयारी आहे. इतर पक्षातून कोणताही 'प्रबळ' कार्यकर्ता, पदाधिकारी भाजपमध्ये येण्यास इच्छुक असेल तर त्याला पक्षात प्रवेश देण्याची आमची भूमिका आहे. बाहेरुन चांगला कार्यकर्ता पक्षात येत असेल तर भाजपचे कार्यकर्ते त्याला समजून आणि सामावून घेतात. यामुळेच भाजप मोठा झाला आहे. एखाद्या ठिकाणी नाराजी येते पण त्यावेळी आम्ही त्यांना समजून सांगतो आणि ते समजून घेतात, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## घाणेरड्या चहागाळणीत दडलेत हजारो जंतू, काळाकुट्ट थर लगेच होईल दूर मिळेल नव्यासारखी चकाकी; फक्त हा २ रुपयांचा उपाय करा

स्वयंपाकघरात नियमित आणि दररोज वापरल्या जाणाऱ्या भांड्यांमध्ये चहागाळणीचा प्रामुख्याने समावेश होतो. अनेकांच्या सकाळची सुरुवात चहागाळणीने वापराने होत असते. सर्वांची आवडती मोरींनींग मॉर्निंग ड्रिंक चहा गाळण्यासाठी याचा वापर केला जातो. आपल्या रोजच्या जीवनात आपल्याला याची फार मदत होते पण या गाळणीला जर आपण नीट स्वछ केले नाही तर काळाबरोबरच ती हळूहळू खराब होऊ लागते आणि त्यावर घाणीचा थर जमा होऊ लागतो. चहाची पाने आणि जाळीत अडकलेली घाण केवळ गाळणी खराब करत नाही तर तुमच्या आरोग्यावरही परिणाम करू शकते.




बऱ्याचदा आपली गाळणी फार खराब झाली की मग त्यावर साचलेला काळा जंतुयुक्त थर दूर करताना फार त्रास होतो आणि म्हणूनच आज आम्ही तुमच्यासाठी चहागाळण साफ करण्यासाठीची एक सोपी आणि अनोखी ट्रिक घेऊन आलो आहोत. या ट्रिकच्या मदतीने तुम्ही सहज, कोणतीही मेहनत न घेता चहागाळणीला स्वछ करू शकता. हा उपाय जुन्या चहागाळणीला नव्यासारखी चकाकी देण्यास मदत करेल. चला तर मग याविषयी सविस्तर जाणून घेऊया.

स्टीलची चहागाळणी अशी करा साफ

जर तुमच्या घरी स्टीलची चहागाळणी असेल, तर ती गॅसच्या आचेवर जाळीची बाजू काही सेकंदांसाठी वर करून ठेवा. जाळीवरील पाने जळू लागताच आणि चाळणी लाल होऊ लागताच, गॅस बंद करा. थोडा वेळ थंड झाल्यावर, स्क्रबरने हलक्या हाताने गाळणीला स्वछ करा. असं करताच तुम्हाला दिसेल की, गाळणीत साचलेली सर्व काळी घाण पाण्यासोबत बाहेर पडत आहे. याने तुमची स्टीलची चाळणी पुन्हा नवीनसारखी चमकेल.

प्लास्टिक गाळणी कशी स्वच्छ करावी

तुम्ही गॅसवर प्लास्टिकची चाळणी ठेवू शकत नाही, पण ती स्वच्छ करणे सोपे आहे. यासाठी टूथब्रशवर डिशवॉशिंग साबण आणि बेकिंग सोडा लावा आणि गाळणीच्या छिद्रांवर चांगले लावा. काही मिनिटे तसेच राहू द्या आणि नंतर स्कॉचच्या मदतीने चहागाळणीला स्वछ करा . यामुळे छिद्रांमध्ये अडकलेली पाने आणि घाण लगेच निघून जाईल.

लिंबू आणि बेकिंग सोडा वापरा

जर तुमची चाळणी खूप घाणेरडी झाली असेल, तर तुम्ही घरात उपलब्ध असलेल्या लिंबू, व्हिनेगर आणि बेकिंग सोड्याचा वापर करूनही तिला स्वछ करू शकता. यासाठी लिंबू, व्हिनेगर आणि बेकिंग सोडा मिक्स केलेल्या पाण्यात गाळणीला काहीवेळ भिजवून ठेवा. यामुळे साचलेला थर सहज सैल होईल. त्यानंतर, स्टील स्क्रबर किंवा टूथब्रशने जाळी स्वच्छ करा. आठवड्यातून एकदा ही पद्धत केल्याने, तुमची चाळणी नेहमीच स्वच्छ आणि चमकदार राहील.

स्वच्छ भांडी आरोग्यासाठी आवश्यक आहेत

भांडी नीट स्वछ नसतील आणि तरीही आपल्या रोजच्या जीवनात जर तुम्ही अशा भांड्याचा वापर करत असाल तर ते तुमच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकते.

यामुळे संसर्गाचा धोका वाढतो, म्हणून चाळणीसारखी छोटी भांडी स्वच्छ ठेवणे हे मोठी भांडी स्वच्छ ठेवण्याइतकेच महत्त्वाचे आहे. थोडेसे प्रयत्न आणि या सोप्या ट्रिक्सच्या मदतीने, तुम्ही तुमचा चहा आणखी निरोगी आणि स्वच्छ बनवू शकता.

## लहान मुलांपासून मोठ्यांसह सगळ्यांचं आवडेल पदार्थ! सोप्या पद्धतीमध्ये बनवा खमंग नारळाच्या पुऱ्या

सणावाराच्या दिवसांमध्ये घरात आवर्जून बनवला जाणारा पदार्थ म्हणजे पुरी. पुरी भाजी खायला सगळ्यांचं खूप जास्त आवडते. घरात पनीर, किंवा मटारची भाजी बनवल्यानंतर आवडीने पुरी बनवली जाते. जेवणाच्या ताटात चमचमीत पदार्थ असतील तर चार घास जास्त जातात. पण आज आम्ही तुम्हाला नारळाच्या सरणाच्या खमंग पुऱ्या बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. काहींना जेवल्यानंतर गोड पदार्थ खाण्यास हवे असतात. कायमच बाजारातील मिठाई आणि साखर टाकून बनवलेल्या पदार्थांचे सेवन करण्याऐवजी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये खमंग नारळाच्या पुऱ्या बनवू शकता. तुम्ही बनवलेला पदार्थ घरातील लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडेल. चला तर जाणून घेऊया खमंग नारळाच्या पुऱ्या बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
- मैदा
- मीठ
- साखर
- जिरा
- हिरवी मिरची
- नारळ
- सुका मेवा
- तूप
- गरम मसाला

कृती:

नारळाच्या पुऱ्या बनवण्यासाठी सर्वप्रथम, मोठ्या ताटात मैदा घेऊन त्यात चवीनुसार मीठ टाका आणि मिक्स करा. त्यानंतर आवश्यकतेनुसार पाणी घालून मैदा मळून घ्या.

कढईमध्ये तूप गरम करून त्यात जिरं, हिरव्या मिरचीचे बारीक तुकडे घालून मिक्स करा. त्यानंतर त्यात गरम मसाला आणि सुका मेवा टाकून मिक्स करून घ्या.

तयार केलेल्या फोडणीमध्ये खोबऱ्याचा किस घालून व्यवस्थित मिक्स करा. खोबऱ्याच्या मिश्रणाला एक वाफ काढून घ्या. तयार केलेले मिश्रण थंड झाल्यानंतर त्यात चवीनुसार मीठ आणि साखर घालून व्यवस्थित मिक्स करा.

मैद्याचे छोटे छोटे गोळे करून



त्यात तयार केलेले मिश्रण भरून पुऱ्या लाटून घ्या आणि कढईमधील गरम तेलात पुरी दोन्ही बाजूने लाल होईपर्यंत तळून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली खमंग नारळाची पुरी. हा पदार्थ घरातील सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.

## मासिक पाळीतील थकवा आणि अशक्तपणापासून आराम मिळवण्यासाठी 'या' पेयाचे करा सेवन, मूड स्विंग्सवर घरगुती उपाय

प्रत्येक महिन्यातील चार किंवा पाच दिवस सर्वंच महिलांना मासिक पाळी येते. मासिक पाळी आल्यानंतर आरोग्य संबंधित अनेक समस्या उद्भवतात. या समस्या वाढू लागल्यानंतर मानसिक तणाव निर्माण होतो. मासिक पाळीच्या दिवसांमध्ये महिलांना शारीरिक आणि मानसिक तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे मासिक पाळी आल्यानंतर पहिल्या दिवशी आराम करण्याचा सल्ला दिला जातो. शरीरात होणाऱ्या हार्मोनल बदलांचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. डोके दुखी, मूड स्विंग्स, उलट्या, मळमळ इत्यादी अनेक समस्या उद्भवतात. याशिवाय अंगदुखी, चिडचिड , थकवा, पोटदुखी आणि पचनाच्या समस्या उद्भवल्यानंतर शरीराची जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. मासिक पाळीत कंबर दुखी किंवा पोटात वेदना वाढू लागल्यानंतर महिला मेडिकलमधील पेन्किलर गोळ्यांचे सेवन करतात. यामुळे तात्पुरता आराम मिळतो. पण वारंवार पेन्किलरच्या गोळ्यांचे सेवन करणे आरोग्यासाठी घातक ठरू शकते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला मासिक पाळीच्या वेदनांपासून आराम मिळवण्यासाठी कोणत्या पेयाचे सेवन करावे? यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात? याबदल सविस्तर माहिती सांगणार आहोत. पुदिन्याच्या पानांचा वापर जेवणातील पदार्थ बनवण्यासाठी केला जातो. यामध्ये असलेले नैसर्गिक गुणधर्म शरीरासाठी अतिशय महत्वाचे ठरतात. पुदिन्याच्या पानांचा सुगंध शरीरात वाढलेला मानसिक तणाव कमी करण्यासाठी मदत करतो. तसेच यामध्ये असलेले नैसर्गिक गुणधर्म पोटात वाढलेल्या वेदनांपासून आराम मिळवून देण्यास मदत करतात. सकाळी उठून नियमित पुदिन्याच्या पानांचा चहा पाल्यास पोटाच्या समस्या कायमच्या दूर होतील. मासिक पाळीतील वेदनापासून झटपट आराम हवा असेल तर पुदिन्याच्या पानांचा चहा प्यावा. यामुळे थकवा, अशक्तपणा कमी होतो. पोटावर वाढलेली थुलथुलीत चरबी डाएट करून सुद्धा कमी होत नाही? मग 'या' पद्धतीने करा ताकाचे सेवन, महिनाभरात व्हाल स्लिम अधिक जाणून घ्या एकदा हे खाऊन पहा, तुमची पुरुषी शक्ती १० पटीने वाढेल. वयाच्या ६९ व्या वर्षीही, एक साधा नियम तुम्हाला मदत करेल. अधिक जाणून घ्या पुदिन्याचा चहा बनवण्याची सोपी कृती: पुदिन्याच्या पानांचा चहा बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोपात पाणी गरम करून घ्या. पाण्याला एक उकळी आल्यानंतर त्यात पुदिन्याची पाने, किसलेले आलं घालून व्यवस्थित चहा उकळवून घ्या. चहाला एक उकळी आल्यानंतर त्यात थोडंस गूळ टाकून व्यवस्थित मिक्स करा. तयार केलेला चहा गाळून त्यात लिंबाचा रस टाकून मिक्स करा आणि नियमित सेवन केल्यास शरीरात अनेक बदल दिसून येतील.

# वारकरी साहित्य परिषदेची ज्ञानोबा- तुकोबा आधार दिंडी १४ ऑक्टोबर रोजी लातूरमध्ये

लातूर : संतभूमी मराठवाड्यात नैसर्गिक आपत्तीमुळे खचून गेलेल्या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी वारकरी साहित्य परिषद सरसावली असून परिषदेच्या वतीने ज्ञानोबा– तुकोबा आधार दिंडी या आगळ्यावेगळ्या सामाजिक चळवळीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील दिंडी मंगळवार दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी लातूर शहरात येणार असल्याची माहिती वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्राचे निरीक्षक रोपण खटावे यांनी शनिवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली.

मराठवाड्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्यांना आळा बसावा, मानसिक आधार मिळून आत्महत्यांचे प्रमाण रोखले जावे या उद्देशाने वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.विठ्ठल पाटील (काकाजी) आणि सचिव डॉ. सदानंद मोरे यांच्या संकल्पनेतून ज्ञानोबा– तुकोबा आधार दिंडी संपूर्ण मराठवाड्याचा दौरा करणार आहे. शनिवारी सकाळी धाराशिव येथून या दिंडीस प्रारंभ झाला. शनिवारी दुपारी बीड, रविवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर, दुपारी जालना, सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी परभणी, दुपारी हिंगोली तर मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी सकाळी नांदेड आणि दुपारी लातूर येथे ही दिंडी पोहचणार असल्याचे सांगून रोपण खटावे पुढे म्हणाले की, लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारी अडीच वाजता या दिंडीचे आगमन झाल्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत शेतकरी बांधवांना परिस्थिती कितीही बिकट आली तरी आम्ही आत्महत्या करणार नाही, अशी शपथ दिली जाणार आहे. मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्याचे कामही या दिंडीच्या माध्यमातून केले जाणार असल्याचे खटावे यांनी सांगितले. वारकरी साहित्य परिषदेचे लातूर जिल्हाध्यक्ष हभप. श्रीधर धुमाळ महाराज यांनी या दिंडीच्या माध्यमातून खचलेल्या शेतकऱ्यांचे मनपरिवर्तन करण्यासाठीचे सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले. या दिंडीमध्ये जिल्हाभरातील वाडी – वस्तीवरील शेतकरी – वारकरी बांधवही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविणार आहेत. भेदरलेल्या – घाबरलेल्या शेतकऱ्यांना मानसिक बळ देणे अतिशय आवश्यक आहे. त्यादृष्टीनेच वारकरी



साहित्य परिषदेचे संस्थापक हभप. विठ्ठल पाटील ( काकाजी ) यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. वारकरी साहित्य परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्षा चंद्रलेखा गुंडरे यांनी या नैसर्गिक आघातातून शेतकरी बांधव लवकरात लवकर सावरला पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या. या आधार दिंडीच्या यशस्वीतेसाठी वारकरी साहित्य परिषदेचे कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत आहेत.मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात हा उपक्रम राबविला जात आहे. शेतकरी असो वा माणूस आधार दिला तरच तो व्यवस्थित जगू शकतो. परिषदेच्या माध्यमातून गाव तेथे हरिपाठ मंडळाची स्थापनाही केली गेल्याचे त्यांनी नमूद केले. सुधाकर महाराज फुलमंटे अतिवृष्टीने होत्याचे नव्हते केल्याने शेतकरी राजा मानसिकदृष्ट्या खचला आहे. त्यांना या माध्यमातून आत्महत्या करणार नसल्याची शपथ दिली जाणार आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती राहणार आहे. हरिपाठानंतर या कार्यक्रमाची सांगता होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शंकर महाराज येदले, लिंबराज महाराज बोळंगे यांचीही उपस्थिती होती.

# संभाजी महाविद्यालयात विद्यार्थी संसद समितीचे गठन

मुरूड/ महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात दि. १०/१०/ २०२५ रोजी मा. प्राचार्य डॉ.अशोक काळम यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी संसदेचे गठन करण्यात आले एकुण १७ प्रतिनिधीपैकी १४ प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी विद्यार्थी संसद सचिवाची निवड करण्यासाठी सर्व सदस्यांना मतदानाविषयी जागृती करण्यात आली. कु. तब्बू पठाण (एन. एस.एस. प्रतिनिधी)यांची सर्व प्रतिनिधींच्या सहमतीने विद्यार्थी संसद सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थी संसद समिती प्रमुख प्रा. दिपक चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी संसदेची ऐतिहासिक पार्श्वभूमी सविस्तर स्पष्ट केली. गुणाणुक्रमे विद्यार्थी प्रतिनिधी निवड १९९३ पासून का चालू झाली ? याची सविस्तर माहिती त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना




दिली. मा. प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी सर्व प्रतिनिधींना लोकशाहीचे महत्त्व समजून सांगितले तसेच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व कौशल्य निर्माण व्हावे आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विद्यार्थी संसद समिती महाविद्यालयामध्ये सक्रियपणे काम करत असते म्हणून विद्यार्थ्यांनी आपले वर्तन महाविद्यालयात कसे ठेवावे ? विद्यार्थ्यांनी आपले हक्क सांगत असताना आपल्या कर्तव्याचीही जाणीव ठेवणे गरजेचे आहे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. शेवटी नवनिर्वाचित विद्यार्थी संसद सचिव कु. तब्बू पठाण हिने आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, माझ्या या पदाचा वापर मी कॉलेजच्या आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी करेन व महाविद्यालयाचे नावलौकिक करण्यासाठी मी सदैव प्रयत्न करेन अशी ग्वाही तिने यावेळी दिली. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सर्व प्रतिनिधींनी एकमुखाने बिनविरोध निवड कु.तब्बू पठाण यांची संसद सचिव म्हणून केली संसद सचिव व सदस्य यांचे मा. प्राचार्य, समिती प्रमुख व सर्व संसद समिती सदस्यांनी पुष्प देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मीना कदम यांनी केले. तर आभार प्रा.दीक्षित मॅडम यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. अरुण कानडे यांनी व सर्व समिती सदस्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी प्रा. पाटोळे सर, प्रा.जाधव मॅडम तसेच शिक्षकेतर कर्मचारी अरुण सवासे व इतर कर्मचारीही उपस्थित होते.

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने केज तालुक्यातील पूरग्रस्तांना २०० किरणा किटचे वाटप

केज/प्रतिनिधी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने केज तालुक्यातील पूरग्रस्तांना २०० किरणा किटचे वाटप करण्यात आले तर केज तालुक्यातील पूरग्रस्तांना मदत केल्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नागरिकांनी आभार व्यक्त केले. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने केज तालुक्यातील राजेगाव,बोरगाव, दैठणा येथील पूरग्रस्तांना संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या हस्ते व मुंबई नगरसेवक बाळा चव्हाण यांच्या सहकार्याने किराणा किटचे वाटप करण्यात आले.



अतिवृष्टीमुळे केज तालुक्यातील अनेक गावात पिकांचे नुकसान तसेच पूर परिस्थितीमुळे घराचे नुकसान झालेले आहे यामध्ये संसाराची राख रांगोळी झालेली दिसून येत आहे म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने एक सामाजिक बांधीलकी म्हणून बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या हस्ते पूरग्रस्तांना २०० किराणा किड्स वाटप बोरगाव, दैठणा,राजेगाव इत्यादी ठिकाणी वाटप करण्यात आले. यावेळी मा. जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, जिल्हा संघटक नितीन धांडे, तालुकाप्रमुख अशोक जाधव शहर प्रमुख तात्या रोडे, प्रभाकर शिंदे,समीरजाधव,धर्मेश सकपाळ उपस्थित होते.

# काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देताच टप्पा वाढ निधीसाठी हालचाली गतिमान वाढीव वेतनामुळे दिवाळी गोड होणारच!

### ...तर आंदोलन करणार -खंडेराव जगदाळे

**...तर आंदोलन करणार खंडेराव जगदाळे**

२० ऑक्टोबर पर्यंत टप्पा वाढीचे अनुदान आदेशासह वेतन मिळाले नाही. तर २१ ऑक्टोबर २०२५ रोजी काळी दिवाळी धरणे आंदोलन सर्व राज्यात करणार असल्याचे कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले.

बीड/प्रतिनिधी विनाअनुदानित शाळानां दिलेल्या वाढीव २० टक्के टप्पा अनुदानासाठी निधीची तरतूद करावी या मागणीसाठी ८ आणि ९ जुलै रोजी आझाद मैदानावर ऐतिहासिक आंदोलन झाले होते. या आंदोलनाचे फलनिष्पत्ती म्हणून २५ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय झाला. परंतु अद्याप ही वाढीव टप्प्याप्रमाणे अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव टप्प्याचे वेतन झाले नाही. या वाढीव टप्प्याप्रमाणे निधीची तरतूद व्हावी यासाठी अनेक दिवसापासून आजी व माजी शिक्षक आमदार

ज्या जिल्ह्यात वाढीव टप्प्याचे आदेश मिळाले नसतील तिथे कृती समितीच्या पदाधिकारी यांना संपर्क साधून आदेश प्राप्त करून घ्यावेत.काही तक्रार किंवा अडचण असतील किंवा आदेश देण्यासाठी टाळाटाळ करीत असतील किंवा याबाबत घोडेबाजार सुरू असेल तर त्या जिल्ह्याच्या कृती समितीच्या पदाधिकारी यांना संपर्क साधावा असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी केले आहे.

यांच्यासह शिक्षक संघटना प्रयत्न करीत आहेत. परंतु शासनस्तरावर कोणतीच हालचाल होत नसल्याने विनाअनुदानित शाळा कृती समितीने वाढीव टप्पा नुसार निधीची तरतूद होऊन वेतन २० ऑक्टोबर २०२५पूर्वी न झाल्यास २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवशीच राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या दारात काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देण्यात आला होता. विनाअनुदानित शाळा कृती



समितीच्या या इशारा आंदोलनाची शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने दाखल घेतली. प्रत्यक्षात टप्पा वाढ निधी वितरण हालचालीस गती आली आहे. सोमवार मंगळवार पर्यंत निधी वितरणाचे आदेश राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी वेतन अधीक्षक यांना दिले जाऊन प्रत्यक्ष विनाअनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा करण्याच्या कामाला गती मिळू शकते अशी माहिती सुत्रांनी दिली आहे.

## रिपब्लिकन सेनेत जाहीर पक्ष प्रवेश

मुंबई दादर / प्रतिनिधी :– दिनांक : १०. १०. २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन दादर येथील रिपब्लिकन सेनेचे केंद्रीय कार्यालय या ठिकाणी बहुजन हृदय सम्राट, तरुणांचे प्रेरणास्थान, सर सेनानी : आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली व नवी मुंबई रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष : वीरेंद्र लगाडे साहेब व महासचिव : दीपक पहुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईतील असंख्य कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन सेनेमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.



यावेळी खालील मान्यवर उपस्थित होते रिपब्लिकन सेनेचे महासचिव मा. बोधनकर साहेब, ठाणे जिल्हाध्यक्ष : आबासाहेब चासकर, ठाणे जिल्ह्याचे नेते : पंढरीनाथ गायकवाड, धायजे साहेब असे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते, पक्ष प्रवेश केलेले व नवनियुक्त पदाधिकारी खालील प्रमाणे आहेत ॲड. पल्लवी राजपक्षे (प्रमुख कायदेशीर सल्लागार), साईनाथ माने (उपाध्यक्ष नवी मुंबई जिल्हा), अक्षय मोरे (ऐरोली तालुका महासचिव), सुभाष यादव (उत्तर भारतीयांचे नेते), बिपिन प्रसाद (नवी मुंबई मुख्य संघटक युवा), अमोल पहुरकर (युवा), आकाश कांबळे (वाशी जुहगाव संघटक).

# इलेक्ट्रोकॉन २०२५’ आंतरराष्ट्रीय परिषदेचे लातुरात भव्य उद्घाटन

लातूर, : – आधुनिक फिजिओथेरपीमध्ये ‘इलेक्ट्रोथेरपी’ ही एक अत्यंत प्रभावी, वैज्ञानिक आणि सुरक्षित उपचार पद्धती असून ती वेदना नियंत्रण, स्नायूंचे पुनरुज्जीवन, रक्तप्रवाह सुधारणा आणि ऊतकांची पुनर्बांधणी यासाठी उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील अलाईड हेल्थ सायन्सचे अधिष्ठाता डॉ. वाय. प्रविण कुमार यांनी केले. एमआयटी लातूर येथील संत ज्ञानेश्वर डोममध्ये आयोजित ‘इलेक्ट्रोकॉन २०२५’ आंतरराष्ट्रीय फिजिओथेरपी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ही परिषद महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून फिलिपिन्सचे डॉ. ख्रिश्चियन रे डी रिमांडो, डॉ. वॉरीन क्रित्यकिआराना व डॉ. विरेंद्र मेश्राम, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, डॉ. सिंगारावेल्लन यांची उपस्थिती होती. डॉ. वाय. प्रविण कुमार पुढे म्हणाले की, आजाराच्या अचूक




निदानानंतर आणि प्रशिक्षित फिजिओथेरपिस्ट च्या मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रोथेरपी दिल्यास ती शस्त्रक्रियेनंतर, इजा झाल्यावर, पक्षाघातानंतर, तसेच दीर्घकालीन वेदनांमध्ये (जसे आर्थ्रायटिस, लो बॅक पेन) प्रभावी ठरते. टेन्स, फॅराडिक करंट, आएएफटी, अल्ट्रासाऊंड, लेझर थेरपी अशा आधुनिक उपकरणांचा वापर यामध्ये केला जातो. फिलिपिन्सचे डॉ. डी रिमांडो यांनी सांगितले की, त्यांच्या देशातील क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये इलेक्ट्रोथेरपी ही वेदना व्यवस्थापन आणि न्यूरोमस्क्युलर पुनः शिक्षणाचा मुख्य आधार आहे. तांत्रिक नवकल्पनांच्या स्वीकारामुळे या उपचारपध्दतीत सातत्याने सुधारणा होत आहेत. तर डॉ. वॉरीन क्रित्यकिआराना यांनी थेरपीटिक अल्ट्रासाऊंडच्या बायोफिजिकल तत्त्वांवर आधारित उपचारपध्दतीचे महत्त्व अधोरेखित केले. परिषदेच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. हनुमंत कराड यांनी लातूरमध्ये होणारी ही राज्यातील पहिली आंतरराष्ट्रीय परिषद असल्याचा अभिमान व्यक्त करत देश–विदेशातील फिजिओथेरपीस्ट, संशोधक व विद्यार्थ्यांसाठी ही परिषद उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. या परिषदेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रतिक्षा लंके व डॉ. अनिल साठे यांनी केले, तर आभार डॉ. सिंगारावेल्लन यांनी मानले. या परिषदेतील प्रमुख उपस्थितांमध्ये डॉ. तारपन शहा, डॉ. आशीश कक्कड, डॉ. इशा तजानी, डॉ. ध्रुव दवे, डॉ. वेणु मोहन, डॉ. विजय पंडिता, डॉ. आकांशा जोशी, डॉ. परविन पठाण, डॉ. जय गुप्ता, डॉ. वैभव महाजन, डॉ. अस्मिता मोहरकर, डॉ. ममता शेट्टी, डॉ. रमनदिप कौर, डॉ. रिमा जोशी, डॉ. श्रुतीका परब, डॉ. रुपम सरकार, डॉ. त्रिवेनी शेट्टी, डॉ. आभा खिस्ती, डॉ. निलिता शेठ, डॉ. वैभव डोळस, डॉ. स्नेहा नरलवर, डॉ. शेफाली बोधना, डॉ. कोमल ब्रम्हभट्ट, डॉ. निधी पांड्, डॉ. पुजा आचार्य यांचा समावेश होता. याशिवाय देश–विदेशातील फिजिओथेरपी तज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी आणि एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राध्यापक व डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर–४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.